# सकस चाऱ्यासाठी संकरित नेपिअर

**डॉ. लक्ष्मण तागड**

- बहुवार्षिक चाऱ्यासाठी बाजरी, नेपिअर यांच्या संकरातून फुले जयवंत आणि फुले गुणवंत या दोन जाती विद्यापीठाने प्रसारित केल्या आहेत.
- पालेदार, मऊ, रसाळ व ऑक्झालिक ॲसिडचे प्रमाण अत्यल्प असल्याने जनावरांना कोणताही अपाय होत नाही. लागवड केल्यावर दर ४० ते ५० दिवसांच्या अंतराने हिरव्या चाऱ्याची सलग ३ ते ४ वर्षे कापणी करता येते. यामध्ये प्रथिनांचे प्रमाण ९ ते १० टक्के असते.
- लागवडीसाठी कसदार, मध्यम ते भारी चांगल्या निचऱ्याची जमीन निवडावी. लागवडीपूर्वी उभी आडवी नांगरट करून ३ ते ४ कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीच्या वेळी प्रति हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे.
- जून ते ऑगस्ट महिन्यात ठोंब किंवा दोन डोळ्यांच्या कांड्या ९० सेंमी अंतरावरील सऱ्यांच्या बगलेत ६० सेंमी अंतर ठेवून लागवड करावी.
- प्रति हेक्टरी २२५ किलो नत्र, ७५ किलो स्फुरद व ६० किलो पालाश द्यावे. यापैकी लागवडीच्या वेळी ७५ किलो नत्र, ३७.५ किलो स्फुरद आणि ३० किलो पालाश द्यावे. चार कापण्यांनंतर बांधणीच्या वेळी ३० किलो नत्र, ३७.५ किलो स्फुरद आणि ३० किलो पालाश द्यावे. प्रत्येक कापणीनंतर प्रति हेक्टरी ३० किलो नत्राची मात्रा द्यावी.
- प्रत्येक कापणीनंतर खुरपणी करावी व गरजेनुसार पाणी द्यावे.
- पहिली कापणी लागवडीनंतर ६० दिवसांनी आणि नंतरच्या कापण्या ४५ ते ५० दिवसांच्या अंतराने कराव्यात. कापणी जमिनीपासून १५ ते २० सेंमी उंचीवर करावी. त्यामुळे चांगले फुटवे फुटतात. प्रति वर्ष प्रति हेक्टरी हिरव्या चाऱ्याचे १२०० ते १५०० क्विंटल उत्पादन मिळते.



संकरित नेपिअर जात : फुले गुणवंत

**- डॉ. लक्ष्मण तागड,**
**९४०३३७६५५६**
**(अखिल भारतीय समन्वित चारा पिके संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. नगर)**